| | |
|---|---|
| | दाखल तारीख – २९/०१/२०२५<br>नोंदणी तारीख – २९/०१/२०२५<br>निकाल तारीख – १७/०७/२०२६ |
| CNR No.MHRT080000512025 | कालावधी – ०१ वर्षे ०५ महिने १९ दिवस |

फॉर्म नं. **XXXII**

भाग 'अ'

(फौजदारी नियमावलीचा पाठ **VI** चा परीच्छेद ४४ (**i**)

देवरुख येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात,

ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

(पिठासीन अधिकारी – रोहिणी रा. कुलकर्णी)

न्यायनिर्णय दिनांक १७/०७/२०२६

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१/२०२५ — निशाणी – १२

प्रथम खबरी अहवालाचा तपशील –
गुन्हा नोंदणी क्रमांक – २७६/२०२४, दिनांक ०८/१०/२०२४
भरारी पथक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी.

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासनतर्फे<br>भरारी पथक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी.,<br>ता., जि. रत्नागिरी.<br>**मुळ फिर्यादी** – वैभव रामचंद्र सोनावले,<br>जवान ब.नं. ०५. |
| **उपस्थिती** | श्री. ए. एल. दड्डेकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | संतोष सावजी पर्शराम, |

| | |
|---|---|
| | **वय –** ५४ वर्षे, **व्यवसाय** – शेती,<br>**राहणार –** पर्शरामवाडी, देवरुख,<br>ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| **उपस्थिती** | श्रीम. एस. ए. गिडये, आरोपीतर्फे विधीज्ञ. |

**भाग ब**

**(फौजदारी नियमावलीचा पाठ VI चा परीच्छेद ४४ (ii)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८/१०/२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | ०८/१०/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २९/०१/२०२५ |
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | २०/०६/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | २८/११/२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयास ठेवल्याची तारीख | २९/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | १७/०७/२०२६ |
| प्रकरणात काही शिक्षा झाल्याची तारीख | निरंक |

**आरोपीचा तपशील**

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामिनावर मुक्त केल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | दोषी ठरविले की, निर्दोष मुक्त केले | शिक्षा झाली असल्यास, तपशिल | संपरिक्षे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संतोष सावजी | निरंक | २०/०६/ | महाराष्ट्र दारुबंदी | आरोपीला | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पर्शराम | | २०२५ | अधिनियम १९४९, चे कलम ६५(ई), (फ) अन्वये. | निर्दोष मुक्त केले. | | |

**<u>न्यायनिर्णय</u>**

**(<u>खुल्या न्यायालयात घोषित</u>)**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५–ई व फ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

**०२**. अभियोगपक्षातर्फे थोडक्यात हकीगत अशी आहे की, दिनांक ०८/१०/२०२४ रोजी फिर्यादी नामे – वैभव रामचंद्र सोनावले, जवान/०५ हे राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, रत्नागिरी येथे कार्यरत असताना खात्रीलायक खबर मिळाल्यावरुन ते, दुय्यम निरीक्षक साहेब, व दोन पंच यांच्यासह सरकारी वाहन क्रमांक एमएच–०९–एजी–०६५३ ने मौजे देवरुख पर्शरामवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे आले असता, पुढे चालत तेथील बांबरच्या प–याकिनारी जंगल भागात छापा टाकला असता तेथे एक इसम संशयास्पद हालचाल करताना दिसून आला. त्याला पकडून पाहणी केली असता त्याच्या ताब्यात प्लॅस्टीक बॅरल, प्लॅस्टीक कॅन व लोखंडी बॅरल इत्यादी मुद्देमाल व त्या बॅरल व कॅनमध्ये गावठी हातभट्टीचा दारु मुद्देमाल मिळून आला. तेथे आरोपी हा रक्कम रुपये ५५,१००/– (रक्कम रुपये पंचावन्न हजार शंभर मात्र) चा दारुबंदी गुन्हयातील मुद्देमाल चोरटा विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगला असताना मिळुन आला.

**०३**. त्यामुळे, त्यांनी आरोपीविरुध्द राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक,

रत्नागिरी येथे तक्रार दाखल केली. त्यावरुन, आरोपीविरुध्द गुन्हा नोंदणी क्र. २७६/२०२४, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई), (फ) अन्वये, गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास श्री. जी. सी. जाधव, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, रत्नागिरी, यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४**. प्रस्तुत खटल्यात आरोपी हजर झाल्यानंतर निशाणी क्रमांक ०७ अन्वये मी आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५६५(ई), (फ) या गुन्हयाचा तपशील निर्धारीत केला. आरोपीने गुन्हा ना कबुल असल्याचे निवदेन दिल्याने सदर खटला पुढे चालविण्यात येत आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ अन्वये नोंदविलेल्या जबाबात आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

**०५**. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहीले. प्रस्तुत प्रकरणात खालील मुद्दे मी विचाराधीन घेतले. त्यावरील कारणांसहीत निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, दिनांक ०८/१०/२०२४ रोजी १२:३० चे दरम्यान मौजे देवरुख पर्शरामवाडी बांबरच्या प–याकिनारी जंगलभागात, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे आरोपीने त्याच्या ताब्यात बेकायदेशीररित्या व विनापरवाना गावठी हातभट्टी चालविण्यासाठी आवश्यक असलेले साहीत्य व | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| | दारुबंदी गुन्ह्यातील मुद्देमाल असा एकुण रक्कम रुपये ५५,१००/– (रुपये पंचावन्न हजार शंभर मात्र) चा मुद्देमाल चोरटा निर्मिती व विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगला असताना मिळुन आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई), (फ) अन्वयेचा गुन्हा केला ? | |
| २. | काय आदेश ? | ...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. ०१ व ०२ करीता</u> –**

**०६.** सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व पुरावा एकत्रित आल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे केवळ ०१ पंच साक्षीदार तपासण्यात आला आहे. दत्ताराम (अ.सा.क्र.०१) यांनी सरतपासात कथन केले आहे की, दिनांक ०८/१०/२०२४ रोजी ते त्यांच्या घरीच होते व त्या दिवशी पोलिसांनी त्याला बोलावून को–या कागदावर त्याची सही घेतली होती. त्यामध्ये मजकुर काय नमुद केला होता, हे त्यांना माहीत नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाकार्य केले नसल्याने त्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्न विचारली. परंतु, फारसे काही उपयुक्त अभियोगपक्षाच्या हाती लागले नाही. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

**०७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, दत्ताराम (अ.सा.क्र.०१)

यांच्या साक्षीतुन पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच जप्त मुद्देमालाचा रासायनिक पृथःकरणाचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. वारंवार संधी देवूनही अभियोगपक्षाने इतर उर्वरीत साक्षीदार यांना तपासले नाही. त्यामुळे, घटनेची फिर्याद व घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नसल्याने आरोपीने घटनेवेळी घटनास्थळी गुन्हा केलेबाबत शंका निर्माण होते.

०८. अशा परिस्थीतीत आरोपीने सदरचा गुन्हा केल्याबाबत कोणताही सबळ पुरावा आलेला नसल्याने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाला नाही. सबब, मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र. ०२ बाबत –**

०९. मुद्दा क्रमांक ०१ वरील नकारार्थी निष्कर्षामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस हक्कदार आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये, या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात येणाऱ्या अपील किंवा इतर कार्यवाहीत त्या न्यायालयासमोर हजर राहण्याची हमी म्हणुन, आरोपीने वैयक्तीक जात मुचलका देणेकरीता त्यास आदेशीत करणे आवश्यक आहे.

१०. उपरोक्त जप्त मुद्देमाल – २०० लि. मापाचे गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने भरलेले ०७ प्लॅस्टीक बॅरल, सुमारे २०० लि. मापाचे ०१ लोखंडी पत्र्याचे भट्टी उपयुक्त रिकामा बॅरल, सुमारे २० लि. मापाचे ०१ प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने पुर्ण भरलेला, हा मुद्देमाल अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्याच्या तरतुदीनुसार नाश करण्याचा आदेश करणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :–

## आदेश

१. ***आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई), (फ)*** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराची बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत.

३. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये आरोपीने रक्कम रुपये १५,०००/– चा जातमुचलका द्यावा.

४. जप्त मुद्देमाल – २०० लि. मापाचे गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने भरलेले ०७ प्लॅस्टीक बॅरल, सुमारे २०० लि. मापाचे ०१ लोखंडी पत्र्याचे भट्टी उपयुक्त रिकामा बॅरल, सुमारे २० लि. मापाचे ०१ प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने पुर्ण भरलेला, याचा अपील कालावधी संपल्यानंतर कायद्याच्या तरतुदीनुसार नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.07.17 17:59:51 +0530

**देवरुख**

**दिनांक – १७/०७/२०२६**

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख,**
**जि. रत्नागिरी.**

## परिशिष्ट I

## भाग क

## (फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI परीच्छेद ४४ (iii)

## साक्षीदारांची यादी

## अ. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | दत्ताराम गणपत दळवी – निशाणी क्रमांक ०९ | पंच |

## बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **निरंक** | | |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोगपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **१** | १० | दत्ताराम (अ.सा.क्र.०१) यांची घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र.०१ येथील स्वाक्षरी |

## बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

## बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## मुद्देमाल

| मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|
| १. | २०० लि. मापाचे गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने भरलेले ०७ प्लॅस्टीक बॅरल. |
| २. | सुमारे २०० लि. मापाचे ०१ लोखंडी पत्र्याचे भट्टी उपयुक्त रिकामा बॅरल. |
| ३. | सुमारे २० लि. मापाचे ०१ प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने पुर्ण भरलेला. |

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.07.17 18:00:00 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांक – १७/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

Judgment/Order in S.C.C. No. 31-2025

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. V. Vaje (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 17/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 17/07/2026 |
| Order uploaded on | : | 17/07/2026 |